# जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण सोसायटी, पालघर
## आरोग्य विभाग, जिल्हा परिषद पालघर

सार्वजनिक आरोग्य विभाग

NATIONAL HEALTH MISSION, MAHARASHTRA
NHM
राष्ट्रीय आरोग्य अभियान महाराष्ट्र

## पदभरती जाहिरात

आरोग्य विभाग, जिल्हा परिषद पालघर, राष्ट्रीय आरोग्य अभियान, अंतर्गत आशा स्वंयसेविका योजना, कडून खालील पदाकरिता कामावर आधारित मोबदला पध्दतीने नेमणूक करावयाची आहे. तरी, इच्छूक उमेदवारांकडून खालील पदांसाठी अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | पदनाम | शैक्षणिक अर्हता | राखीव | वयोमर्यादा | रिक्त पदांची संख्या | एकत्रित मानधन (रु) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | गटप्रवर्तक | किमान पदवीधर, (उच्चतम शैक्षणिक पात्रता धारकास प्राधान्य MS-CIT, मराठी टायपिंग (३० शब्द प्रतिमिनिट) व इंग्रजी टायपिंग (४० शब्द प्रतिमिनिट), Word or Excel अनुभव असणाऱ्यांना प्राधान्य. | महिला उमेदवार | २१ ते ३८ | १ | ८,७७५/- |

१) सदरची पदे निव्वळ कामावर आधारित मोबदला तत्वावरील आहेत.
२) उच्च शैक्षणिक पात्रता व अनुभव असणाऱ्या उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल.
३) उमेदवारांनी अर्जामध्ये भरावयाची माहिती पुढीलप्रमाणे-
   १) अर्ज केलेल्या पदाचे नाव, २) ठळक अक्षरात स्वतःचे संपूर्ण नाव, ३) अर्जदाराचा पत्ता, दूरध्वनी क्रमांक / भ्रमणध्वनी क्रमांक (अनिवार्य), ई-मेल, ४) कामाचा अनुभव-काम केलेली संस्था-एकूण कालावधी, ५) शैक्षणिक अर्हतेचा संपूर्ण तपशील-अभ्यासक्रमाचे नाव, संस्था, विद्यापीठाचे नाव, उत्तीर्ण झाल्याचे वर्ष, गुणांची टक्केवारी, ६) इतर शैक्षणिक अर्हता.
४) मुलाखतीसाठी कोणताही प्रवास खर्च अथवा भत्ता देण्यात येणार नाही.
५) सदयस्थितीमध्ये आशा स्वंयसेविका व गटप्रवर्तक म्हणुन कार्यरत असलेल्या महिलांना प्राधान्य.
६) पद भरती व अंतिम निवड यादी करण्याचे अधिकार जिल्हा निवड समितीला राहतील.
७) दोनपेक्षा अधिक हयात मुल असणाऱ्या उमेदवारांना राष्ट्रीय आरोग्य अभियानाच्या पदावर यापुढे निवड करण्यात येणार नाही. याकरीता लहान कुटुंबाचे प्रमाणपत्र अर्जासोबत दिलेल्या नमुन्यानुसार सादर करावे.
८) **सविस्तर जाहिरात पात्र/अपात्र उमेदवारांची यादी, निवड/प्रतिक्षा यादी व पदभरती प्रक्रियेबाबतची सर्व माहिती/सुचना https://www.zppalghar.gov.in या संकेतस्थळावर वेळोवेळी प्रसिध्द करण्यात येईल याबाबत अर्जदारास कुठलाही स्वतंत्र पत्र व्यवहार केला जाणार नाही.**
९) नियुक्ती आदेश देण्यापुर्वी अर्जासोबत जोडलेल्या कागदपत्राची सर्व मुळ कागदपत्र निवड समिती मार्फत पडताळणी करुन सादर करण्यात आलेली कागदपत्रे चुकीची आढळल्यास उमेदवारांना निवड प्रक्रियेतुन बाद करण्यात येईल याची नोंद घ्यावी.
१०) सदर जाहिरातीस अनुसरुन ज्या उमेदवारांचे अर्ज विहित मुदतीत प्राप्त होतील केवळ अश्याच उमेदवारांचे अर्ज विचारात घेतले जातील. अन्य कोणत्याही संदर्भातील यापुर्वी या कार्यालयास प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाही.
११) अर्जदारांनी आपल्या अर्जावर त्यांचा सध्या सुरु असलेला मोबाईल नंबर व ई-मेल आयडी अचुक नोंदवावा. तसेच ते भरतीप्रक्रिया पुर्ण होईपर्यंत सुस्थितीत राहील याची दक्षता घ्यावी.
१२) निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्ती आदेश मिळाल्यापासुन ७ दिवसांमध्ये नियुक्तीच्या ठिकाणी रुजु होणे बंधनकारक राहील. अन्यथा त्याची नियुक्ती आदेश संपुष्टात आणुन प्रतिक्षा यादीतील पुढील उमेदवारास नियुक्ती देण्यात येईल.
१३) **भरती प्रक्रिया स्थगित करणे/रद्द करणे/पदभरती प्रक्रियेत बदल करण्याचे सर्व अधिकार मा.अध्यक्ष निवड समिती तथा मा.मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, पालघर यांनी राखुन ठेवले आहेत. याबाबत उमेदवारास कोणताही दावा करता येणार नाही**

१४) नियुक्ती आदेश स्वीकारताना उमेदवारांनी अर्जामध्ये नमुद केलेल्या सर्व शैक्षणिक व इतर कागदपत्रांच्या मुळ प्रती सादर करणे बंधनकारक राहील. मुळप्रती सादर न केल्यास सदर उमेदवारांची नियुक्ती आपोआप संपुष्टात येईल याची नोंद घ्यावी.

१५) **प्राप्त झालेल्या अर्जावरुन गुणांकनानुसार मेरीट लिस्ट तयार करण्यात यईल. सदर मेरीटलिस्ट जिल्हा परिषदच्या https://zppalghar.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. उमेदवारांना सदरबाबत आक्षेप असल्यास ते सादर करण्याकरिता ०२ दिवसाची मुदत देण्यात येईल. आक्षेपासोबत त्यांच्या पृष्ठयर्थ योग्य पुरावे सादर करण्यास सुचित करणेस येईल अशा प्रकारे प्राप्त आक्षेपांचे निराकरण करुन त्यानुसार अंतिम निवड यादी तयार करण्यात येईल व ती जिल्हा परिषद पालघर या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.**

१६) सदर भरती प्रक्रिया पुर्ण झाल्यानंतर एक वर्षाच्या आत एखादया ठिकाणी कर्मचारी यांनी राजीनामा दिल्यामुळे पद रिक्त झाल्यास प्रतीक्षा यादी वरील उमेदवारास नियुक्ती आदेश दिला जाईल. प्रतिक्षा यादी प्रसिध्द केल्याच्या तारखेपासुन ०१ वर्षा करीता वैध राहील.

१७) अर्जदार हा संबंधीत पदासाठी शारिरिक व मानसिक दृष्टया सक्षम असावा तसेच शासकीय कर्मचारी यांच्यावर पुर्वीच्या शासकीय कर्मचारी कार्यकाळात कुठल्याही स्वरुपाचे प्रशासकीय व वित्तीय कार्यवाही, दंडात्मक कार्यवाही किंवा फौजदारी अथवा इतर कुठल्याही प्रकारचे गंभीर गुन्हयाची नोंद नसावी किंवा झालेली नसावी.

१८) विहित पात्रता धारण न करणाऱ्या उमेदवारांचे अर्ज, विहित नमुन्यात नसलेले किंवा योग्य प्रकारे न केलेले अर्ज, मजकुर अपुर्ण किंवा चुकीचा भरलेला अर्ज, खाडाखोड केलेला अर्ज, स्वाक्षरी नसलेले, आवश्यक गुणपत्रकांच्या व प्रमाणपत्रांच्या साक्षांकित प्रती नसलेले अर्ज अगर तत्सम माहिती योग्य रित्या न दर्शविलेले अर्ज, लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र अपुर्ण भरलेल व न जोडलेले अर्ज इत्यादी प्रकारे सादर केलेल्या अर्जदारांना अपात्र ठरविण्यात येईल याची अर्जदारांनी नोंद घ्यावी.

उमेदवाराने विहित नमुन्यातील अर्ज व आवश्यक कागदपत्रांच्या छायांकित प्रतीसह आपले अर्ज अर्ज मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पालघर यांच्या नावे **दिनांक १३/१०/२०२५ ते दिनांक २४/१०/२०२५** (सुटटी चे दिवस वगळून) कार्यालयीन वेळेत जिल्हा आरोग्य अधिकारी, आरोग्य विभाग, ११३ ते ११६ पहिला मजला, राष्ट्रीय आरोग्य अभियान, नविन जिल्हा परिषद इमारत, पालघर बोईसर रोड, कोळगाव, येथे अर्ज सादर करावे. दिनांक **२४/१०/२०२५ नंतर** पर्यंत सायंकाळी ६.१५ वाजेपर्यंत कार्यालयीन वेळेत सुट्टीचे दिवस वगळून पोस्टाद्वारे, कुरिअर अथवा प्रत्यक्षात (By Hand) सादर करावेत. इतर कोणत्याही पध्दतीने (ऑनलाईन, ई-मेल) आलेले अर्ज स्विकारले जाणार नाहीत याची उमेदवाराने नोंद घ्यावी. ठरवुन दिलेल्या दिनांकानंतर अर्ज कुठल्याही परिस्थितीत स्वीकारले जाणार नाही. तसेच पोस्टाद्वारे शेवटच्या तारखेनंतर प्राप्त अर्ज स्वीकारण्यात येणार नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

**स्वाक्षरी /-**
**सदस्य सचिव**
**जिल्हास्तरीय निवड समिती व**
**जिल्हा आरोग्य अधिकारी**
**जिल्हा परिषद पालघर**

**स्वाक्षरी /-**
**अध्यक्ष**
**जिल्हास्तरीय निवड समिती व**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद पालघर**